# SUCCESS KEY TEST SERIES

X (English)

**(Unit Test-2 Marathi ( 5,6,7,8))**

Marathi-

DATE:

TIME: 2 hrs

MARKS: 40

SEAT NO:

**विभाग १ - गदय**

**प्र. १** **उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (गद्य)**

**A1)** i) चौकटी पूर्ण करा 1

1) रेखामावशीच्या सफाईबद्दल तक्रार करणारी - ☐

2) सुमितच्या लॅपटॉपवर अभिषेक पाहत होता. - ☐

ii) चौकटी पूर्ण करा 1

☐ ← आल्या आल्या रेखामावशींनी यांकडे मोर्चा वळवला → ☐

अभिषेकनं दार उघडलं आणि कामवाल्या रेखामावशी आत आल्या. आल्या आल्या त्यांनी किचनमधील सिंकमध्ये वाट पाहणाऱ्या भांड्यांकडे आपला मोर्चा वळवला. अभिषेकला आज उठायला उशीरच झाला होता. काल त्यांच्याकडे सुमित आला होता कानपूरहून. सुमित म्हणजे अभिषेकचा आतेभाऊ. तो आय. आय. टी. कानपूरला शिकत होता. काल संध्याकाळी सुमित आल्यापासून गप्पांसोबत सुमितच्या लॅपटॉपवर त्यानं केलेले नवे प्रोजेक्ट अभिषेक पाहत होता. त्यामुळे रात्री झोपायला दोन वाजले. "काय हो हे, तुम्हीच फरशी पुसता आणि तुम्हीच ती घाण करता?" हॉलमधून स्नेहलचा आवाज आला. अभिषेक हॉलमध्ये आला तर रेखामावशी फरशी पुसत होत्या; पण मागे त्यांच्या पायाचे काळे मळकट ठसे पुसलेल्या फरशीवर उमटले होते. स्वच्छतेची भोक्ती असलेली स्नेहल त्यामुळे त्रासली होती. रेखामावशीही बिचाऱ्या वरमल्या होत्या.

"अवो, स्नेहाताई, मी कुठं एसीत बसूनशान काम करत्ये बाई. शेनामातीत काम करावं लागतं! आन आमच्या वस्तीचा रस्ता बी समदा उखणलाय. समदी धूळ लागती पायास्नी. आन धा-धा मिन्टाला हातपाय धोयाला येळ बी नाय आन पानी तरी कुठं हाय बक्कळ?"

**A2)** i) चौकटी पूर्ण करा 1

1) रेखामावशीच्या वस्तीचा रस्ता असा होता. - ☐

2) या ठिकाणाहून स्नेहलचा आवाज आला. - ☐

ii) कारणे लिहा 1

स्नेहा त्रासली कारण ...............

**A3)** i) प्रत्यय ओळखून विभक्ती लिहा 1

कानपूरहून

ii) समानार्थी शब्द लिहा 1

1) अस्वच्छ - ...............

2) ध्वनी - ...............

**A4)** स्वमत 2

तुमच्या घरातील मोलकरणीला कशा प्रकारे वागविता ते लिहा?

**विभाग २ - पदय**

**प्र. २ खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (पद्य)**

**A1)** i) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा 1

माना उंचावलेले हात - ☐

ii) चौकटी पूर्ण करा 1

1) एवढे दिवस वाट पाहण्यात गेले - ☐

2) कवीने प्रत्येकवेळी विचार केला - ☐

| |
|---|
| दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले.<br>हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे<br>शेकडो वेळा चंद्र आला; तारे फुलले, रात्र धुंद झाली;<br>भाकरीचा चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली. |
| हे हात माझे सर्वस्व; दारिद्र्याकडे गहाणच राहिले<br>कधी मनात उंचावलेले, की कलम झालेले पाहिले<br>हरघडी अश्रू वाळविले नाहीत; पण असेही क्षण आले<br>तेव्हा अश्रूच मित्र होऊन साहाय्यास धावून आले. |
| दुनियेचा विचार हरघडी केला, अगा जगमय झालो<br>दु:ख पेलावे कसे, पुन्हा जगावे कसे, याच शाळेत शिकलो<br>झोतभट्टीत शेकावे पोलाद तसे आयुष्य छान शेकले<br>दोन दिवस वाट पाहण्यात गेले; दोन दु:खात गेले. |

**A2)** i) एका शब्दात उत्तरे लिहा 1

1) पोलाद येथे शेकवले जाते

2) आयुष्य हे शोधण्यात वाया गेले.

ii) सत्य की असत्य ते लिहा 1

1) जगाच्या शाळेत कवी शिकले

2) रुपया शोधण्यातच आयुष्य बरबाद झाले.

**A3)** काव्यसौंदर्य 2

कवितेत व्यक्त झालेले जीवनसत्य याबाबत तुमचे विचार स्पष्ट करा

**A4)** काव्यसौंदर्य 2

हिशोब करतो आहे किती राहिलेत डोईवर उन्हाळे या ओळीतील आशय स्पष्ट करा.

**विभाग ३ - स्थूलवाचन**

**प्र. ३ खालील कोणत्याही एक कृती सोडवा.** **(3)**

**1)** तुम्हाला समजलेल्या सूर्याची भूमिका स्पष्ट करा.

**2)** सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणा-या मानवी भावभावना स्पष्ट करा.

**विभाग ४ - भाषाभ्यास**

**प्र. ४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.**

**(१) समास -** **(2)**

खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| i) भाजीभाकरी | .............. | .............. |
| ii) अष्टभुजा | .............. | .............. |

**(२) वाक्यप्रचार -** **(2)**

**खालील पादीतील वाक्यप्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरुन वाक्ये पुन्हा लिहा.**

खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
थक्क होणे →


**प्र. ४ (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**विरामचिन्हे** **(2)**

विरामचिन्हांचा योग्य वापर करा.
i. तू का थापा मारतोस, अभ्यास का नाहीस केलास
ii. केवढी उंच इमारत ही

**विभाग ५ - उपयोजित लेखन**

**प्र. ५ 1. खालील विषयावर पत्र लिहा.** **(5)**




**(5)**

**2. बातमी लेखन**

**आदर्श विद्यालय**

२८ फेब्रु

रविनगर, गडचिरोली
'विज्ञान दिन' सोहळा

सकाळी ८
ते सं. ५

**विज्ञान दिनानिमित्त**

**वैज्ञानिक साहित्य प्रदर्शनाचे आयोजन**

* उद्घाटक - डॉ. श्री. विजय आफळे, प्रणिशास्त्र विभाग प्रमुख, सिटी कॉलेज, गडचिरोली

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट दिली.

**3. कथालेखन** **(5)**

**खालील अपूर्ण कथा वाचा, तुमचा विचार व कल्पकतेने ती कथा पूर्ण करा.**
**(दिलेली अपूर्ण कथा लिहून घेण्याची आवश्यकता नाही.)**

शाळेची उन्हाळी सुट्टी सुरू झाली होती. सगळी मुले फक्त मजा करण्याच्या धुंदीत होती. अमर सुद्धा आपली सुट्टी मजेत व निसर्गाच्या सानिध्यात घालवण्यासाठी आजीकडे गावी चालला होता. खिडकीच्या बाजूला बसून पळत्या झाडांची गंमत पाहत होता. खिडकीतून थंड हवा येत होती म्हणून खूप बरे वाटत होते. बसमध्ये खूप गर्दी होती गरमीचा काळ असल्यामुळे जशी दूपार झाली तशी गरम हवा लागू लागली. जोपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा झाडे होती तोपर्यंत थंड हवा लागत होती. पण पुढें पुढे तर झाडे विरळ होत गेली व गरमी वाढू लागली. या बसमध्ये एक आजीबाई होत्या. त्या एका पिशीवीतून दाणे काढून रस्त्यावर टाकत होत्या. ज्या ठिकाणी झाडे नव्हती त्याठिकाणी त्यांनी खूप दाणे टाकले. असे त्यांचे संपूर्ण प्रवासभर चालले होते. अमरला समजत नव्हते की ही आजी नेमके काय करत आहे